# प्रकरण ७ वे

## निष्कर्ष

| अ.नं. | प्र क र ण ७ वे | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| | नि ष्क र्ष | ११४ |
| | सं द र्भ ग्रं थ सू ची | ११८ |
| | नियतकालिके | |

# प्रकरण ७ वे

## निष्कर्ष

रत्नाकर मतकरी लिखित 'जौळ' कादंबरीचा एक चिकित्सक अभ्यास तपशीलवारपणे केल्यानंतर त्यांच्या कादंबरीविषयी काही महत्वाचे निष्कर्ष हाती आले ते पुढीलप्रमाणे :

(१) आधुनिक मराठीच्या कालखंडात हरिभाऊ आपटेंपासून कादंबरी लेखनास प्रारंभ झाला. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने कादंबरी हा वाङ्‌मयप्रकार विकसित झाला. त्यात सर्वश्री वा.म. जोशी, डॉ. श्रीधर केतकर, श्री ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, मनोहर शहाणे, भालचंद्र नेमाडे, रत्नाकर मतकरी, यांच्यापर्यन्त म्हणजे साठोत्तरी कालखंडातील लेखकापर्यन्त आशयाची अनेकविध वळणे दृष्टीपथात येतात. त्यात रत्नाकर मतकरींनी 'जौळ' ही कादंबरी लिहून बदलत्या कौटुंबिक जीवनाचे एक नवेच पण धक्कादायक चित्र रेखाटले आहे. आणि मराठी रसिक त्यायोगे अस्वस्थ झाला. त्यामुळे मराठी वाङ्‌मयाच्या वाटचालीत मतकरींच्या 'जौळ' कादंबरीचे स्थान विशेषत्वाने लक्षात घ्यावे लागेल.

(२) 'जौळ 'कादंबरीचा लेखनकाल मार्च १९८० हा असून, त्यातील आशय कौटुंबिक विसंगतीचा सूर व्यक्त करणारा आहे. त्यातील व्यक्तिचित्रे पाहिल्यानंतर साने कुटुंबाची झालेली वाताहत त्यामध्ये

पाहायला मिळते. कौटुंबिक संघर्षाला ही माणसेच काही ना काही प्रमाणात कारणीभूत होतात. हेच त्यातून दिसून येते.

(३) 'जौळ' कादंबरीतील जीवन संघर्षांचा विचार करतांना प्रामुख्याने साने कुटुंबीय भागवत कुटुंबीय, फडसुले कुटुंबीय यांच्या तील दैनंदिन घडामोडीमुळे संघर्षांची बीजे रुजली गेली आणि तो संघर्ष तसाच वाढत गेला. आणि त्यातूनच साने कुटुंबातील नयन आणि प्रसादच्या मनात आत्महत्येचा विचार पक्का झाला व ते आत्महत्येस प्रवृत्त झाले. परिणामत: साने कुटुंबीयांची शोकांतिका झाली.

(४) कौटुंबिक जीवनात एकत्र कुटुंब पध्दती व अविभक्त कुटुंब पध्दतीचाही विचार केला जातो. कौटुंबिक जीवनातील ताणतणाव हे काही वेळा शोकांतिकेला जबाबदार ठरतात. कुटुंबातील व्यक्तींचे गैरसमज, जीवनाविषयीची अनासक्ती, जबाबदारी पेलण्यातील असमर्थता इ. गोष्टीमुळे व्यक्ती आत्महत्येचा निर्णय घेते. आत्महत्येमुळे प्रश्न सुटत नाहीत. आणखी ते दुसऱ्यासाठी उरतात.

(५) 'जौळ' कादंबरीवरुन 'माझं काय चुकलं ?' हे नाट्यरुपांतर रत्नाकर मतकरी यांनी केले आहे. या दोन्ही कलाकृती आशयाच्या दृष्टीने आणि त्यातील प्रश्नांच्या

दृष्टीने साम्यच दर्शवितात. कादंबरीतील काही घटना, प्रसंग नाटकात वगळलेले असले तरी नाटकाच्या प्रभावी चित्रणात कुठेही उणेपणा जाणवत नाही. समजुतदारपणा जर कुटुंबात असेल तर कुटुंबातील वाद आणि संघर्ष टाळता येऊ शकतील. 'जौळ' कादंबरीत घडलेल्या शोकांतिकेचे नाटकांत उदात्त सुखांतिकेत रत्नाकर मतकरी यांनी रुपांतर केले आहे. त्याच दृष्टीने 'जौळ' कादंबरीतील प्रश्नांना नाटकात उत्तर दिले आहे.

(६) 'जौळ कादंबरीत मतकरी यांनी आत्मनिवेदन पध्दतीचा उपयोग केला आहे. तर 'माझं काय चुकलं ?' या नाटकात संवादातील आत्मनिवेदन पध्दती वापरली आहे. 'जौळ' कादंबरीतील भाषा ही मध्यमवर्गीय समाजाची आहे. त्यातूनच मतकरींनी परिणामकारकता साधली आहे. अधूनमधून बोलीभाषेचा वापरही केला आहे. त्या स्वरुपाचीच भाषा नाटकात वापरली आहे. कादंबरी आणि नाटक यांचा आकृतिबंध अत्यंत यशस्वी-पणे सांभाळला आहे. 'जौळ' कादंबरीत लेखकाने मांडलेला प्रश्न मनाला अस्वस्थ करणारा ठरला तरी लेखकाने त्याचे समाधानकारक उत्तर नाटकात दिले आहे. कादंबरी ही नाटकाचा पूर्वार्ध मानली तर नाटक हे कादंबरीचा उत्तरार्ध व्हावे असे म्हणता येईल तरी 'जौळ' कादंबरी आणि 'माझं काय चुकलं ?' नाटक हे एकाच लेखकाची दोन भिन्न रुपी एकात्म आशयाचे कलात्म रुप आहे.



SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

'जोळ' कादंबरीचा तपशीलवारपणे आणि चिकित्सक दृष्टीने हा अभ्यास पूर्ण केला असला तरी, हे निष्कर्ष त्या कलात्मकरुपाच्या संदर्भात मांडले आहेत. याचा अर्थ लेखकाच्या ह्या कलात्मरुपाच्या संदर्भात हे निर्णायक भाष्य नाही. आज-मितीला अभ्यास करतांना जे जाणवले त्याची ही नोंद आहे. या कलावंताचे कलानिर्मितीचे कार्य अद्यापही सुरु असल्याने त्याच्या एकूणच साहित्याच्या संदर्भात या कलात्मरुपाचा विचार करता येईल. तेव्हा कदाचित या मतामध्ये आणखी भर पडू शकेल.

रत्नाकर मतकरी यांची

'जौळ' कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास.

परिशिष्ट

० संदर्भ ग्रंथ सूची ०


| अ.नं. | लेखकाचे नाव | पुस्तकाचे नांव | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १. | कुलकर्णी डॉ. भीमराव (संपा) | अस्मिता महाराष्ट्राची | मराठा मंदिर प्रकाशन मुंबई. प.आ. १९७१. |
| २. | कुलकर्णी श्री मा. | कादंबरीची रचना | उन्मेषा प्रकाशन नागपूर-२.प.आ. १९५६ |
| ३. | कुलकर्णी श्री मा. | कादंबरी समीक्षा | उन्मेषा प्रकाशन, नागपूर-२.प.आ. १९७२ |
| ४. | कुलकर्णी डॉ. मदन | मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि विकास | श्री मंगेश प्रकाशन नागपूर, प.आ. १९८४. |
| ५. | कुलकर्णी प्रा. गो.म. (संपा) | नवसमीक्षा काही विचार प्रवाह | मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे प.आ.१९८२ |
| ६. | कुलकर्णी अ.अं.(संपा) | प्रदक्षिणा | कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, १९७२. |
| ७. | कुलकर्णी द.भि. | पार्थिवतेचे उदयास्त | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. प.आ.१९७८. |
| ८. | कुरुंदकर नरहर | धार आणि काठ | देशमुख आणि कंपनी, पुणे, प.आ.१९७१ |